

# मेट्रो ३ चा पहिला डमी कोच दाखल

मुंबई, ता. ५ : कुलाबा ते सीप्झ या भूमिगत मेट्रो ३ मार्गाचा पहिल्या डमी-मॉडेल (मॉक) डबा (कोच) मुंबईत दाखल झाला आहे. ऑगस्टमध्ये, एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्यासह एमएमआरडीएच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोलिंग स्टॉकचे स्केल मॉडेलचे अनावरण केले होते. याच कार्यक्रमात या डब्याला लाईन ३ चा एक्वा लाईन म्हणून नामकरण करण्यात आले होते.